**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर(शहर) यांचे कार्यालय,**
**आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स, नागपूर पिन कोड- 440001Email ID -**
**tahsildarngpcity@gmail.com, दुरध्वनी क्र. 0712-2561975**

क्र.अ.का./त.आस्था/तह-नाग (श)/कावि- 187/2023 दिनांक- 07.06.2023

**वाचा- मा.जिल्हाधिकारी नागपूर यांचे पत्र क्र.आस्था/कार्या-04/अ-09/सीआर-40/2023, दिनांक 22.05.2023**

# जाहीरनामा

सर्व नागरीकांना याव्दारे सुचित करण्यात येते की, तहसिल कार्यालय,नागपूर (शहर) तालुक्यातील खालील नमुद केलेल्या साझाकरीता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातुन कोतवाल पद भरावयाचे आहे.

| अनु.क्र. | सा.कोड | गावाचे नाव | समाविष्ट गावे | कोतवाल पदसंख्या | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 8- अ | **बोरगांव** | बोरगांव ,गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी | 01 | विजा (अ) |
| 2 | 7 | **दाभा** | दाभा, हजारीपहाड,तेलंगखेडी | 01 | इमाव |
| 3 | 11 | **नारा** | नारा, नारी, इंदोरा | 01 | इमाव |
| 4 | 34-अ | **दिघोरी** | दिघोरी ,हिवरी,वाठोडा | 01 | इमाव (महिला) |
| 5 | 44 | **सोमलवाडा** | सोमलवाडा, सोनेगाव | 01 | आदुघ |
| 6 | 17 | **कळमना** | कळमना ,भरतवाडा | 01 | अराखीव |
| 7 | 34 | **पारडी** | पारडी ,पुनापूर,भांडेवाडी | 01 | अराखीव |
| 8 | 11- अ | **झिंगाबाई टाकळी** | झिंगाबाई टाकळी, जरीपटका, मानकापुर | 01 | अराखीव (महिला) |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरीता इच्छुक स्थानिक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटो सहीत अर्ज आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहीत दिनांक **08 जुन, 2023 ते 22 जुन, 2023 पावेतो, सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत तहसिलदार, तहसिल कार्यालय,नागपूर शहर यांच्या कार्यालयात** सादर करावेत.(शासकीय सुटटीचे दिवस,वगळुन) व त्याबाबत पोच घ्यावी. अर्जाचा नमुना तहसिल कार्यालय, नागपूर (शहर) यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत व दिवशी (सुटटीचे दिवस,वगळता) उपलब्ध आहे. विहीत तारखेनंतर येणा-या व अपुर्ण भरलेल्या अर्जाचा तसेच जाहिरनाम्याच्या पुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

## कोतवाल भरती सबंधी वेळापत्रक

1.अर्ज स्विकारण्याची **तारीख** 08 **जुन,** 2023 **ते** 22 **जुन,** 2023 **रोजी सांयकाळी** 05.00 **वाजेपर्यंत** (सुटटीचे दिवस वगळुन)

2.अर्जाची छाननी दिनांक 23 **जुन,** 2023 **रोजी सकाळी** 11.00 वाजेपासुन तहसिल कार्यालय,नागपूर (शहर) येथे करण्यात येईल. पात्र उमेदवारांची यादीची प्रसिध्दी त्याच दिवशी तहसिल कार्यालय, नागपूर (शहर) यांचे नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

O/C

Scanned with OKEN Scanner

3. उमेदवारांनी आपले अर्जाच्या पोच पावतीसह, प्रवेश पत्रासह परिक्षेस उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

4.सदर परिक्षेला आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य, कॅलक्युलेटर, स्मार्ट वॉच,ear Phone मोबाईल इत्यादी घेवुन बसता येणार नाही.

5.उमेदवारांची निवड लेखी परिक्षेत मिळालेले एकुण गुण लक्षात घेवुन गुणानुक्रमे करण्यात येईल.

## कोतवाल भरतीसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे

1.उमेदवार ज्या साझासाठी अर्ज करीत आहे तो नागपूर शहर तालुक्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने रहिवासी असल्याबाबतचे ( घरटॅक्स पावती/रेशनकार्ड /निवडणुक ओळखपत्र /आधारकार्ड) यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही. संबधित पुरावा स्व-स्वाक्षरीत असावा.

2.उमेदवाराचे वय जाहिरनाम्याच्या दिनांकास कमीत कमी 18 वर्ष व जास्तीत जास्त 40 वर्ष या दरम्यान असावे. (शासन निर्णय दिनांक 05/09/2013) (पुराव्या दाखल जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / पॅनकार्ड / ड्रायव्हींग लायसन्स यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.) या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही. संबधित पुरावा स्व.स्वाक्षरीत असावा. तसेच स्व-घोषणापत्र संलग्न करावे.

3. उमेदवाराची शैक्षणीक पात्रता कमीत कमी 4 थी उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

4. उमेदवार शारिरीक दृष्टया सक्षम असावा, नियुक्ती नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र 1(एक) महिन्यात उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. सदर प्रमाणपत्र 1(एक) महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यात येईल.

5.उमेदवाराने चारित्र्य पडताळणीबाबत **Police Clearance Certificate (Dy.Com.of Police व्दारा स्वाक्षरीत)** नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र 1(एक) महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यात येईल.

6. सक्षम अधिका-यांचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **जातीचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सद्यस्थितीत वैध असलेले प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) व सद्यस्थितीत वैध असलेले आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रमाणपत्र न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच उमेदवाराची नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन 6(सहा) महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्वसुचना न देता कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी नियुक्ती रद्द (समाप्त) करण्यात येईल.**

7.शासन महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.82/2001/मसेआ/2000/प्र.क्र.412/का-2, दि.25.05.2001 आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा अ व भज ब, क, ड, प्रवर्गातील महिला आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला अर्जदारांनी सन 2023-24 या कालावधी करीता दि.31/03/2024 पर्यत वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर(शहर) यांचे कार्यालय,**
**आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स, नागपूर पिन कोड- 440001Email ID -**
**tahsildarngpcity@gmail.com, दुरध्वनी क्र. 0712-2561975**

8. अर्जा सोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच निवड प्रक्रिये दरम्यान कुठलाही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यात येईल.

9.अर्ज हा अर्जदारानेच वैयक्तीक स्वत: हजर राहुन सादर करावा.अर्ज पोस्टाव्दारे व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे (उदा. e-mail इ.) पाठविण्यात येवु नये.

10.अपुर्ण माहितीचे अर्ज रद्द करण्यात येईल. त्याबाबत कोणताही आक्षेप /पत्रव्यवहार ग्राहय धरला जाणार नाही.

11.अर्जामधील माहिती खोटी आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती झाल्यानंतर ती रद्द करण्यात येईल.

12.कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील.

13.कोतवाल पदासाठी होणारी परिक्षा ही वस्तुनिष्ठ ,बहुपर्यायी स्वरुपाच्या ज्ञानावर आधारीत प्रश्नांची राहील.

14.भरती प्रक्रिया स्थगीत करणे/रद्द करणे /भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाच्या स्तरावर राखीव ठेवण्यात आले आहे. याबाबत कोणासही दावा करता येणार नाही.

15.शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक के.ओ.टि 1073-3043 एल दिनांक 28.02.1974 चे परिच्छेद क्र.08 अन्वये इतर सर्व गोष्टी बरोबर असतील तर कोतवालाच्या जागेवर नेमणुक करतांना कोतवालाच्या मुलास कोतवाल म्हणुन नेमणुक देण्यास इतर सर्व बाबी समसमान असल्यास इतर उमेदवारापेक्षा प्राध्यान्य दयावे असे आदेश आहेत ते पालन करण्यात येईल.

16.ज्या अर्जदाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवाराची लेखी परिक्षा -100 गुणाची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

17.प्रक्रिया शुल्क :-उमेदवारांनी खालील प्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

| **प्रवर्ग** | **खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | **मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी** |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | रु 300/-(रु तिनशे मात्र) | रु 200/-(रु दोनशे मात्र) |

18. कोतवाल पदाकरीता विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय,नागपूर (शहर), येथे **अध्यक्ष,कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, नागपूर (शहर)** यांच्या नावाने दिनांक 08 जुन,2023 ते दिनांक 22 जुन, 2023 पावेतो, शासकीय सुटीचे दिवस वगळुन सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यत व्यक्तीश: सादर करावे. अर्जासोबत विहीत परिक्षा शुल्क रोखपाल, नायब नाझर यांचेकडे जमा करुन रितसर पावती अर्जासोबत जोडावी.

19.अर्जदाराला निवड प्रक्रियेकरीता स्वखर्चाने यावे लागेल.

20.लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ते नुसार अंतिम निवड केली जाईल. नियुक्तीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील, अन्यथा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

वरील सर्व अटी व शर्तीना अनुसरुन " **कोतवाल निवड समिती** " **तहसिल कार्यालय,नागपूर (शहर)** यांचा अंतिम निर्णय राहील.

Wapalu

**सदस्य सचिव**
**कोतवाल निवड समिती,तथा**
**तहसिलदार,नागपूर (शहर)**

Scanned with OKEN Scanner

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर(शहर) यांचे कार्यालय,**
**आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स, नागपूर पिन कोड- 440001Email ID - tahsildarngpcity@gmail.com, दुरध्वनी क्र. 0712-2561975**

---

**प्रतिलिपी---माहिती करीता सविनय सादर.**

1.मा. जिल्हाधिकारी,(आस्थापना शाखा) नागपूर.

2.मा.उपविभागीय अधिकारी, नागपूर (शहर)

3.मा.आयुक्त,नागपूर महानगर पालिका,नागपूर यांना याव्दारे विनंती करण्यात येते की, सदर जाहीरनामा आपले कार्यालयात प्रसिध्द करण्यास आपण आपल्या स्तरावरुन आपल्या संबधित अधिनस्त कर्मचा-यास निर्देशित करावे.

**माहिती तथा नमुद दिलेल्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

**1.जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जि.का.नागपूर यांनी NIC वर सदर जाहीरनाम्याची एक प्रत प्रसिध्द करावी.**

2.सहाय्यक आयुक्त,(सतरंजीपुरा झोन, आसी नगर झोन, हनुमान नगर झोन, धरमपेठ झोन, लक्ष्मी नगर झोन,मंगळवारी झोन, नेहरु नगर झोन,लकडगंज झोन, धंतोली झोन ,गांधी बाग/महाल झोन) यांना याव्दारे सुचीत करण्यात येते की, सदर जाहीरनाम्याची प्रत आपले झोन कार्यालयात प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

3. तलाठी, 44 सोमलवाडा, 34-अ दिघोरी , 17 कळमना, 34 पारडी ,11 नारा, 7 दाभा ,8- अ बोरगांव , 11- अ झिंगाबाई टाकळी, यांनी जाहीर मुनादी व इतर मार्गाने व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

4.माल जमादार,तहसिल कार्यालय नागपूर(श)यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.जाहीरनामयाची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

5.निवडनस्ती

**सदस्य सचिव**
**कोतवाल निवड समिती,तथा**
**तहसिलदार,नागपूर (शहर)**

08/6/2023
लिपीक
आवक/जावक
सतरंजीपुरा झोन क्र.७,
म.न.पा. नागपूर.

8/6/23
आवक लिपीक
झोन क्र. ., म.न.पा.
नागपूर.

आवक लिपीक
दिनांक 8/6/23
गांधी झोन महाल क्र. ६
म.न.पा. नागपूर

Scanned with OKEN Scanner